**<u>पुढील उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वादी यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. पी.एस.तांबे पाटील यांचेद्वारेः—</u>**

१. मी ७वी पास असुन माझी जन्म तारीख ०१/०६/१९५४ अशी आहे. मला वयाच्या पंधरा वर्षानंतर समजायला लागले. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेले शपथपत्र हे सात वर्षापुर्वी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे शपथपत्र हे दिनांक ११/०४/२०१८ रोजी न्यायालयात दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा वादीने प्रतिवादी विरुध्द सन २०१० ला लावला. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्यासाठी मी वादींना मदत केली आणि सदर दाव्यासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले.

२. हे म्हणणे खरे आहे की, मला सदर दाव्यातील वादग्रस्त मिळकतीचे गट नंबर, सर्व्हे नंबर, क्षेत्र आकार सांगता येणार नाही. मी स्वतःहुन सांगतो की, मला काही गट नंबर सांगता येतील. गट नं. १, ६, १० व २०३ असे गट नंबर मला माहित आहे. मी शिवे गावचा रहिवासी आहे. शिवे आंबेठाणचे अंतर २२ कि.मी. चे आहे. शिवे ते वासोलीचे अंतर १२ कि.मी. आहे. माझे वादीकडे ये जा, लग्नकार्य व सनासुदीला असते. वादी व प्रतिवादी यांची कुटुंबे एकच आहेत परंतु गावे वेगवेगळी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांची आडनावे वेगवेगळी आहेत. वासोली व आंबेठाण यांच्यातील अंतर १० कि.मी. चे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा प्रतिवादी क्र. ८ हा भाउ आहे. मी स्वतःहुन सांगतो की, भाउ नसुन अनुसयाचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. ८ हे विभक्त राहतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या जमिनी वेगळया असुन त्यांच्या वहिवाटी तसेच राहणे पण वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. ८ हे ४० वर्षापासुन वेगळे राहतात. मी स्वतःहुन सांगतो की, २५ वर्षापासुन विभक्त राहतात.

३. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवादीच्या कुटुंबाची सर्व माहिती आहे. प्रतिवादीचे वडील नारायण यांचे पुर्ण नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नारायण ची मुले शंकर, काळुराम, गोविंद व निवृत्ती असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नारायणला वारुन शंभर वर्ष झाले. मी स्वत:हुन सांगतो की, त्यांना वारुन ७० ते ८० वर्ष झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नारायण हयात असतांना वादीच्या आईने कधीही वाद उपस्थित केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नारायण वारल्यानंतर त्याचे वारस विभक्त राहतात. हे म्हणणे खरे नाही की, नारायण मयत झाल्यानंतर शंकर, काळुराम व निवृत्तीला वारस कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नारायण मयत झाल्यानंतर शंकर, काळुराम व निवृत्तीला वारस नसल्याने बुडीत झाले. मी स्वत:हुन सांगतो की, शंकरला वारस आहेत.

४. हे म्हणणे खरे नाही की, गोविंदचे वारस हे गोविंद वारल्यानंतर विभक्त राहतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे चाळीस ते पन्नास वर्षापासुन विभक्त राहतात.

**प्रश्न** — वादी व प्रतिवादी यांच्या आंबेठाण व वासोली येथील मिळकती वेगवेगळया आहेत.

**उत्तर** — वादीचा सदर मिळकतीवर अधिकार आहे.

हे म्हणणे खरे आहे की, वासोली गावाला एमआयडीसी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती हया एमआयडीसी मध्ये गेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीतील काही मिळकती प्रतिवादींनी विकलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर कोटयावधी रुपयांचे कर्ज आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीपैकी १०,२२,३६,६०,१६६,१६०/१, १६०/२ या मिळकती एमआयडीसीमध्ये गेल्या आणि याचा मोबदला प्रतिवादींनीच घेतला आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांनी सदरच्या मिळकती या एमआयडीसी मध्ये गेल्या याबाबत कोठेही वाद घातलेला नाही. दावा मिळकतीपैकी गट नं. ३४, १२६, १४८, १४९ हया मिळकती प्रतिवादींनी

त्रयस्त इसमाला विक्री केलेल्या आहेत की नाही याबाबत मला सांगता येणार नाही. दावा चालु असतांना गट नं. ११७ ही मिळकत प्रतिवादींनी त्रयस्त इसमाला विक्री केलेल्या आहेत की नाही याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ६ ही माझी सख्खी चुलत बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या जमीनी जश्या एमआयडीसी मध्ये गेल्या तशी माझी जमीन देखील धरणामध्ये गेली. सन १९७० साली माझे कुटुंब विभक्त झाले.

**प्रश्न —** तुमच्या कुटुंबाच्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ६ चे देखील गट नं. ५२१, ५२५, १४, ३८२ मध्ये तिचा हिस्सा आहे का ?

**उत्तर —** सदरच्या मिळकती या प्रतिवादी क्र. ६ च्या आईच्या वडिलांच्या असल्यामुळे त्यांचा सदर मिळकतीमध्ये हिस्सा आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, भाम आसकेड धरणाचा मोबदला मी एकटयाने घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी क्र. ६ पैसे द्य ायचे नव्हते म्हणुन मी सदरचा दावा वादीला पुढे करुन प्रतिवादी विरुध्द दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ६ हिने माझे विरुध्द पोलीस स्टेशनला मी मोबदला तिला दिला नाही म्हणुन माझे विरुध्द फसवणुकीची तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला माझी त्याबाबत चौकशी झाली. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र. ६ चा मोबदला देतो असे पोलीस स्टेशनला सांगितले आणि तेथे वाद मिटवला. हे म्हणणे खरे आहे की, मी आजपर्यंत प्रतिवादी क्र. ६ ला पैसे दिले नाहीत.

७. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्रामध्ये नमुद केलेल्या नारायण बद्दल मला त्याचा जन्म, लग्ण व मृत्यु कधी झाले याचा तपशिल सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, शंकरला भागुबाई ही पत्नी असुन त्यांचा जन्म, लग्ण व मृत्यु कधी झाले याचा तपशिल सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वासोली म्हटल्यानंतर संपुर्ण पाचपुते कुटुंबाचे गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, शंकर आणि नारायण ही देवांची नावे असुन पुर्वी ठेवायची पध्दत होती. हे म्हणणे खरे आहे की, वासोली गावामध्ये शंकर व

नारायण नावाची भरपुर व्यक्ती होत्या. हे म्हणणे खरे नाही की, शंकर नारायण पाचपुते या नावाची चार पाच व्यक्ती होते. मी स्वत:हुन सांगतो की, एकच व्यक्ती होता. एकच व्यक्ती होता हे दाखविण्यासाठी माझेकडे कसल्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, भागुबाई शंकर पाचपुते या नावाची गावामध्ये चार ते पाच माणसे होती. मी स्वत:हुन सांगतो की, एकच व्यक्ती होती.

**प्रश्न** — भागुबाई भगवान या नावाची गावामध्ये चार ते पाच माणसे होती का ?

**उत्तर** — या नावाच्या व्यक्तीबाबत मला काही सांगता येणार नाही.

अनुसया शंकर नावाची दोन व्यक्ती गावामध्ये होती हे मला सांगता येणार नाही. मी स्वत:हुन सांगतो की, एकच व्यक्ती होती.

**प्रश्न** — नारायणला शंकर मुलगा असुन शंकरची पत्नी भागुबाई होती, शंकर व भागुबाई यांना मुलगी अनुसया होती हे दाखविणारा तुमच्याकडे कोणता कागदोपत्री पुरावा आहे ?

**उत्तर** — भागुबाई ही आमची आत्या असल्यामुळे मला तिची मुलगी अनुसया होती हे माहिती आहे.

**प्रश्न** — अनुसया बद्दल तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा आहे काय ?

**उत्तर** — आम्ही पाहुणे माणसे असल्यामुळे आमच्याकडे काही कागदोपत्री पुरावा नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, शंकर व भागुबाईला ज्ञानेश्वर नावाचा मुलगा होता आणि तो चार ते पाच वर्षांनी वारला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शंकर आणि भागुबाईला त्यानंतर कोणतेही अपत्ये झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले शपथपत्र खोटे असुन माझी चुलत बहिण प्रतिवादी क. ६ हिला पैसे द्यावे लागु नये म्हणुन मी आज रोजी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

उलटतपासामध्ये वादीच्या कुटुंबांबद्दल सांगितलेली सर्व माहिती खोटी आहे. तसेच मला प्रतिवादी बाबत देखील काहीही माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

दिनांक : ०९/१२/२०२५

श्रवणोत्तर स्विकृत,

SNEHA VENKATRAO UTKAR

Digitally signed by SNEHA VENKATRAO UTKAR
Date: 2025.12.09 17:42:10 +0530

(एस. व्ही. उतकर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
खेड—राजगुरुनगर, जि.पुणे